# सहकार

## इयत्ता बारावी









# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.


(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# सहकार

## इयत्ता – बारावी



२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.

J5J3N6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पहिले पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे - ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**वाणिज्य शाखा मुख्य समिती**

**डॉ. नरेंद्र पाठक**
**(अध्यक्ष वाणिज्य समिती)**

श्री. मोहन साळवी (सदस्य)
डॉ. मुकुंद तापकीर (सदस्य)
डॉ. प्रशांत साठे (सदस्य)
सीएस्. महेश आठवले (सदस्य)
श्री. सुरेंद्र निरगुडे (सदस्य)
श्री. नारायण पाटील (सदस्य)
डॉ. ज्योती गायकवाड (सदस्य)
श्री. अनिल कापरे (सदस्य)
श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन (सदस्य)
श्रीमती लक्ष्मी पिल्लई (सदस्य)
श्रीमती मृणाल फडके (सदस्य)
डॉ. संगीता मांडके (सदस्य)
श्रीमती उज्ज्वला गोडबोले (सदस्य सचिव)

**सहकार**
**राज्य अभ्यासगट सदस्य**

**श्री. मोहन साळवी**
**(अध्यक्ष आणि समन्वयक)**

श्री. किशोर सावकारे
श्री. अनिलकुमार महाजन
श्री. महादेव कांबळे
श्री. राजेंद्रकुमार व्हनमाने
श्री. अरुण गायकवाड
श्री. प्रमोद शिरोडे
श्री. प्रकाश भस्मे
श्री. प्रकाश बोकडे
सौ. पल्लवी राजेश

**मुखपृष्ठ व सजावट**
श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई

**अक्षरजुळणी**
बलदेव कंप्युटर्स, मुंबई

**समन्वयक**
**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**
**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**
७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**
N/PB/2020-21/60,000

**मुद्रक**
SHREE SAMARTH QUALITY WORKS,
NAVI MUMBAI

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता १२ वी कला व वाणिज्य शाखेसाठी 'सहकार' या विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तक सादर करताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

सहकाराचे मानवी समाजजीवनातील महत्त्व लक्षात घेऊन इयत्ता ११ वी मध्ये आपण सहकाराचे प्राथमिक स्वरूपातील ज्ञान अभ्यासले आहे. त्यावरच आधारित इयत्ता १२ वीच्या अभ्यासक्रमात सहकारी संस्थांचे संघटन, सचिवाचा पत्रव्यवहार, सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०, सहकारी बँकांचा अभ्यास, सहकार शिक्षण व प्रशिक्षण आणि सहकार क्षेत्रापुढील आव्हाने हे घटक समाविष्ट करण्यात आले आहेत.

या विषयाच्या घटकांची मांडणी 'महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ च्या अनुषंगाने करण्यात आली आहे. या कायद्यात वेळोवेळी दुरूस्त्या झाल्या असून ९७ वी सुधारणा व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २०१३ अन्वये अनेक दुरूस्त्या करण्यात आल्या आहेत. या सुधारणांचा व दुरूस्त्यांचा विचार अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

सहकार कायद्यातील कायदेशीर व तांत्रिक बाबींचा विचार करून सहज सोप्या भाषेत घटकांची मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांचा वयोगट व आकलनक्षमता यांचाही विचार करण्यात आला आहे.

पाठ्यपुस्तकाच्या सुरूवातीला क्षमता विधाने दिली आहेत. या क्षमतांना अनुसरूनच आशय समजावून देताना पाठ्यपुस्तकात तक्त्यांचा वापर केला आहे. स्वय: अध्ययनाला प्रोत्साहन देण्यासाठी व विषयाची आवड निर्माण करण्यासाठी, तसेच अतिरिक्त माहितीसाठी कृती दिलेल्या आहेत. याशिवाय महत्त्वाच्या संज्ञा व स्वाध्याय तसेच उपयोजनावर आधारित प्रश्नप्रकारांचा समावेश केला आहे.

व्यावसायिक पर्यावरणात नवीन बदलाची आवश्यकता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना नवीन बदलांना सामोरे जाण्यासाठी प्रश्नपत्रिकेतील सुधारित आराखड्याचा विचार करून प्रश्नरचना व पाठ्यघटकांची रचना केलेली आहे.

अभ्यासक्रमातील उपघटकांच्या कागदपत्रांचे नमुने व आवश्यक माहिती प्रथम पृष्ठावरील क्यू. आर. कोडच्या माध्यमातून देत आहोत. जेणेकरून अध्ययन व अध्यापन परिणामकारक होईल.

या पाठ्यपुस्तकाच्या परिपूर्णतेसाठी योगदान दिलेले अभ्यास समिती सदस्य, अभ्यासगट सदस्य, भाषांतरकार व समीक्षक या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

हे पुस्तक शिक्षण तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अपेक्षा नक्कीच पूर्ण करेल असा आम्हांस विश्वास वाटतो.

**(विवेक गोसावी)**

**संचालक**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**पुणे**

**दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०**

**भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१**

## क्षमता विधाने

इयत्ता १२ वी सहकार विषयाच्या अभ्यासक्रमातून खालील क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतील.

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | सहकारी संस्थांचे संघटन | • सहकारी संस्थेची संघटन रचना स्पष्ट करता येणे.<br>• सभासद, प्रकार, अधिकार, जबाबदाऱ्या यांची माहिती सांगता येते.<br>• कार्यकारी समिती, कार्ये, अधिकार, जबाबदाऱ्या यांची माहिती सांगता येते.<br>• अध्यक्ष, कार्ये, अधिकार, जबाबदाऱ्या यांची माहिती सांगता येते.<br>• सचिवाची कार्ये, अधिकार, जबाबदाऱ्या, गुण यांची माहिती सांगता येते.<br>• सहकारी संस्थेच्या विविध पत्रव्यवहाराची मांडणी करता येते. |
| २. | सहकारी संस्थांचा आयुक्त व निबंधक | • सहकारी संस्थांचा आयुक्त व निबंधकाची भूमिका, कार्ये, अधिकार व जबाबदाऱ्या सांगता येतात. |
| ३. | महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० | • महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा - १९६० (९७ वी सुधारणा व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २०१३) मधील भांडवल उभारणी, सभा यांबाबत माहिती सांगता येते.<br>• हिशेब व हिशेबतपासणी, तसेच त्याबाबतच्या कायदेशीर तरतुदी यांची माहिती सांगता येते. |
| ४. | सहकारी बँकांचा अभ्यास | • नागरी सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य सहकारी बँक यांची कार्ये, समस्या व उपाय सांगता येतात. |
| ५. | सहकार शिक्षण व प्रशिक्षण | • सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे, गरज याची माहिती सांगता येते.<br>• विविध सहकारी प्रशिक्षण संस्थांची माहिती सांगता येते. |
| ६. | सहकार क्षेत्रापुढील आव्हाने | • सहकार क्षेत्रापुढील आव्हाने व त्यावरील उपाय यांची माहिती सांगता येते. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | सहकारी संस्थेचे संघटन | १ |
| २ | सहकारी संस्थेच्या सचिवाचा पत्रव्यवहार | २७ |
| ३ | सहकारी संस्थांचा आयुक्त व निबंधक | ४८ |
| ४ | महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० | ६४ |
| ५ | सहकारी संस्थेचे हिशेब व हिशेब तपासणी | ९९ |
| ६ | नागरी सहकारी बँक | ११७ |
| ७ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १२८ |
| ८ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | १३९ |
| ९ | सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण | १५० |
| १० | सहकार क्षेत्रापुढील आव्हाने | १६३ |
| | संदर्भ सूची | १७२ |
| | संक्षिप्त रूपे | १७२ |